उडत्या तबकड्या : तथाकथित विज्ञान

डॉ. जयंत नारळीकर



'पृथ्वीपलीकडे जीवसृष्टि आहे काय ?' ह्या प्रश्नांत अभिप्रेत असलेल्या विषयाबद्दल सर्वसामान्य सुशिक्षित माणसाला जिज्ञासा असणं सहजिक आहे, आपण ज्या पृथ्वीवर जन्मलो आणि वाढलो ती पृथ्वी अंतराळातली एकमेव मोठी वस्तु नव्हे. ती ज्या सूर्याभोवती फिरते तसे शंभर अब्ज तारे आपल्या आकाशगंगेत आहेत असे आधुनिक खगोलशास्त्र सांगते. आणि आपल्या आकाशगंगेप्रमाणे ताऱ्यांनी भरलेली कोटयवधि तारकाविश्वे आपल्या दुर्बिणींना दिसू शकणाऱ्या विश्वांत आहेत. अशा गजबजलेल्या विश्वांत केवळ पृथ्वीवरच जीवसृष्टि असावी हे खरे वाटत नाही.

बहुतेक शास्त्रज्ञांना असेच वाटते. अंतराळाचा विस्तार आणि वरील आकडेवारी लक्षांत घेता पृथ्वीपलीकडे जीवसृष्टि तर असेलच, पण ती मानवांपेक्षा पुष्कळ प्रगत स्थितीत लक्षावधि संख्येने आपल्या आकाशगंगेत असली पाहिजे असे अनेक शास्त्रज्ञांना वाटते. ताऱ्यांदरम्यानच्या प्रदेशांत मोठाले कार्बनिक रेणु गेल्या दीड दशकांच्या निरीक्षणांतून सापडले आहेत. पृथ्वीवरील जीवसृष्टीच्या मुळाशी असे रेणू दिसतात. तेव्हा जीवसृष्टीच्या अस्तित्वाचा परिस्थितिजन्य पुरावा वाढत आहे, असे म्हणायला हरकत नाही.

विज्ञानाचे शॉर्टकटस्

सृष्टीची गूढे उकलण्याची विज्ञानाची एक ठराविक कार्यप्रणाली आहे. 'धीमी पण खात्रीलायक' असे तिचे वर्णन करता येईल. त्यामुळे सृष्टीबद्दल विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर विज्ञानाला तडकाफडकी सापडत नाही. एखाद्या सिद्धान्तावर विज्ञानाचे शिक्कामोर्तब व्हायला कधी कधी बराच काळ जातो. पण मानवी जिज्ञासा मानवाला गप्प बसू देत नाही. विज्ञानाची वाट दिरंगाईची वाटली की साहजिकच त्याला आडवाटा आणि शॉर्टकट्स दिसू लागतात. विज्ञानाचा सरळ पण धीमा मार्ग सोडून आडमार्गाने पटकन उत्तर शोधण्याचा त्याला मोह होतो. अशा प्रयत्नांना – ते विज्ञानच आहे – असे मानण्याची प्रवृत्ति अलीकडे दिसून येते. वैज्ञानिकांनी मात्र अशा प्रयत्नांना नांव दिले आहे 'तथाकथित विज्ञान.'

'तथाकथित' विज्ञान हे वरवर पाहिले की विज्ञानासारखेच दिसते. पण किंचित खोलवर तपासून पाहिले की, त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन, विज्ञानांत पाळली जाणारी शिस्त, वैज्ञानिक भाकितांतली अचूकता यांचा अभाव दिसून येतो. फलज्योतिष हा एक तथाकथित विज्ञानाचा नमुना आहे. ग्रहांची गति अनियमित वाटते. ती तशी असते का ? ह्या प्रश्नाचे वैज्ञानिक उत्तर मिळायला कित्येक शतकांचा काळ जावा लागला. दरम्यान मानवी जिज्ञासेला एक 'सोपे उत्तर' सांपडले. ग्रह अनियमित तऱ्हेने फिरतात कारण ते स्वेच्छाचारी आहेत – त्या अर्थी ते शक्तिमान असणार – त्यामुळे ते इतरांवर, म्हणजे आपल्यासारख्या तुच्छ मानवांवर आपला प्रभाव टाकू शकतात – म्हणून मानवांनी आपली आचारसंहिता ग्रहांच्या अनुमोदनाने ठरवावी. अशा विचारसरणीतून फलज्योतिष जन्माला आले. विज्ञानाला ग्राह्य असा पुरावा त्या विषयामागे अद्याप मिळालेला नाही, ही मात्र वस्तुस्थिति आहे.

मी या लेखाच्या प्रारंभी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर मिळवायला विज्ञानाला वेळ लागणार आहे. तोपर्यंत कांही मानवी जिज्ञासा गप्प बसणार नाही हे ओघाने आलेच. आणि तिला मानवी कल्पनाशक्तीची जोड मिळाली की त्यांतून तथाकथित विज्ञान बाहेर पडेल यांत शंका नाही.

उडत्या तबकड्या, बर्म्यूडा त्रिकोण, देवांचे रथ इत्यादि प्रकार म्हणजे अशा तथाकथित विज्ञानाचे नमुने. प्रथम आपण यांचा थोडक्यांत परिचय करून घेऊ.

उडत्या तबकड्या हे नांव १९४७ मध्ये केनेथ आर्नोल्ड याने आपल्या विमानांतून पाहिलेल्या बशांच्या आकाराच्या अंतराळयानांवरून पडले. अलीकडल्या काळात आर्नोल्डपूर्वी अशी याने पाहिल्याचा दावा कोणी केल्याचे ऐकिवांत नाही. पण आर्नोल्डच्या अनुभवाला प्रसिद्धि मिळाल्यावर आजपर्यंत लोकांनी उडत्या तबकड्या किंवा तत्सम प्रकार पाहिल्याची शेकडो उदाहरणे आहेत. सर्वच याने बशीसारखी नसतात. कांही सिगारसारखे तर कांही गोल – एकंदर ४०–५० तरी वेगवेगळे प्रकार नमूद करण्यांत आले आहेत. सर्वसामान्य माणसाचा असा समज असतो की ही याने पृथ्वीबाहेरून अतिप्रगत जीवसृष्टीकडून येत असावीत.

मानवसदृश जीव

फॉन डॅनिकन, अँड्रयू थॉमस इत्यादि लेखकांनी आणखी काही 'अतिमानवीय' चमत्कारांकडे लक्ष वेधले आहे. पूर्वी पृथ्वीवर एकेकाळी परग्रहावरून तेजस्वी मानवसदृश लोक आले आणि त्यांनी येथे मानवाचे बीजारोपण केले किंवा पूर्वी मानवापेक्षा प्रगत जीव पृथ्वीवर आले होते आणि काही काळ राहून गेले. असे तर्क 'पुराव्यासकट' अशा लेखकांनी 'देवांचे रथ', 'आपण काही पहिले नव्हतो' इत्यादि पुस्तकांतून मांडले आहेत.

अनेक अनोळखी चीजा !

जेथे जेथे अशा तथाकथित विज्ञानाचा विज्ञानाशी वैज्ञानिक संबंध आला तेथे तेथे त्यातील दावे निराधार किंवा अस्पष्ट स्वरूपाचे आढळून आले. उडत्या तबकड्यांचा सखोल अभ्यास कित्येक वर्षे झाला आहे, आजहि चालू आहे. उडत्या तबकड्या पाहणारे साक्षीदार अविश्वसनीय ठरले किंवा त्यांनी पाहिलेल्या वस्तु आकाशांतले ग्रह ठरले, तर कित्येकदा ती अंतराळयाने मानवनिर्मितच असल्याचे दिसून आले. आजकित्येकदा दृष्टिभ्रमामुळे काही नसताना तिथे अंतराळयान आहे असा पण अनुभव लोकांना आलेला आहे. वायुमंडलांत घडणाऱ्या नैसर्गिक प्रकारांमुळे असे दृष्टिभ्रम होतात. वाळवंटांत मृगजळ अशाच दृष्टिभ्रमामुळे दिसते.

वैज्ञानिक पुरावा नाहीच !

उडत्या तबकड्यांबद्दल शास्त्रज्ञांनी अविश्वास व्यक्त केला की कधी कधी त्यांच्यावरच तोंडसुख घेण्यांत येते ! परंतु जेथे सबळ पुरावा नाही तेथे अशा घटना खरोखरच घडल्या हे शास्त्रज्ञाने तरी काय म्हणून कबूल करावे ? ज्यांना उडत्या तबकड्या दिसतात त्यांचीच ही जबाबदारी नव्हे का, की स्वतःचे विधान ग्राह्य मानले जावे असा पुरावा त्यांनी सादर करावा ? (बरोबर हीच परिस्थिति फलज्योतिषाच्या समर्थकांबाबतीत दिसून येते. विज्ञानाला ग्राह्य असा पुरावा अद्याप फलज्योतिषांना सादर करता आला नाही ही वस्तुस्थिति आहे. वैज्ञानिकांनी असे पुरावे तपासल्याची कित्येक उदाहरणे आहेत!) ज्यांना उडत्या तबकड्या आणि तत्सम तथाकथित विज्ञानाबद्दल सहानुभूति वाटते त्यांना माझी अशी विनंती आहे की, जर त्यांना ह्या गोष्टी वैज्ञानिकांनी ग्राह्य धराव्यात असे वाटत असले तर त्यांनी प्रथम वैज्ञानिक पुरावा कोणत्या प्रकारचा असतो याची माहिती करून घ्यावी आणि मग त्यांच्याजवळ असलेली माहिती अशा प्रकारचा पुरावा म्हणून मानता येईल का हे तपासून पाहावे.

अमेरिकेत असाधारण घटनांच्या चौकशा करणारी एक समिति स्थापन झाली आहे. (Committee for scientific investigation of claims of the paranormal). त्या समितीतर्फे The Zetetic हे एक नियतकालिक नुकतेच सुरू झाले आहे. मी वर उल्लेखिलेल्या बर्म्यूडा त्रिकोण प्रभृति घटनांचा वैज्ञानिक निकषांवर अभ्यास करून त्यांत असाधारण असे काही नव्हे अशा निष्कर्षाप्रत लेख झेटेटिकमध्ये प्रसिद्ध होतात. शक्य असल्यास जिज्ञासूंनी ते पाहावे.त्याचप्रमाणे १४ जुलै १९७७ च्या इंग्लंडमधील 'न्यू सायंटिस्ट' साप्ताहिकांत ह्या विषयांवरील लेख वाचनीय आहेत.

■■■